# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

केंद्र सरकार कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स – एआयवर नियंत्रण आणणारा कायदा करण्याच्या विचाराधीन असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशात एक व्यापक भारत एआय मिशन सुरू करण्यात आलं असून, त्यात एआय कंप्युट सुविधा निर्माण करणं, कौशल्य फ्रेमवर्क, स्टार्ट-अप्ससाठी वित्तपुरवठा, इनोव्हेशन सेंटर, डेटासेट प्लॅटफॉर्म तयार करणं आणि नवीन ॲप्लिकेशन तयार करणं हे सात स्तंभ असल्याचं ते म्हणाले. यासंदर्भात अन्य एका प्रश्नावर उत्तर देताना वैष्णव यांनी, छत्रपती संभाजीनगर इथं आर्टिफिशिअल इंटेलिजन्स लॅब्सचं काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली. सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी यासंदर्भातला प्रश्न उपस्थित केला होता. यामुळे सेमी कंडक्टर उद्योगासह शेती उत्पादनाला देखील चालना मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये एक लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. पुण्याहून रेल्वे मार्गाचं दुहेरीकरण तसंच तिहेरीकरणाचं काम सुरु असून, रेल्वेचं जाळं मोठ्या प्रमाणात विस्तारणार येणार आहे. त्यानंतर रेल्वे थांबे वाढवण्यात येणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. राज्यात रेल्वेशी संबंधित कामं योग्य रितीने सुरु असल्याचं सुळे यांनी नमूद केलं.

****

दरम्यान, राज्यसभेत आज सत्ताधारी आणि विरोधकांच्या गदारोळामुळे कामकाजात व्यत्यय आला. आज सभागृहाचं कामकाज सुरु होताच विरोधकांनी विविध

मुद्यावरुन दिलेले स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळून लावले. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी, सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावाबद्दल विरोधकांचा निषेध केला. काँग्रेस पक्षाने याबाबत माफी मागावी, असं ते म्हणाले. तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार राज्यघटनेत बदल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप, काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी केला. दोन्ही बाजुंनी आरोप – प्रत्यारोप वाढत गेल्यानं सदनाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यावर सभापतींविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी आक्षेप घेतला. यावरुन गदारोळ वाढत गेल्यानं राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

****

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन झालं. या स्पर्धेमुळे जगभरात भविष्यात निर्माण होणार्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी विविध मार्ग उपलब्ध होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. देशभरात ५१ केंद्रांवर होत असलेल्या या स्पर्धेत ८६ हजाराहून अधिक संघ सहभागी होत आहेत. यात महाराष्ट्राल्या मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या केंद्रांचाही समावेश आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी साडे चार वाजता या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

नागपूरच्या हिंगणा इथं जी एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातही हॅकेथॉनची सुरुवात झाली. इन्फोसिसचे वरिष्ठ टेक्निकल आर्किटेक्ट शिव सोनी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेमधून भारत तंत्रज्ञान क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करणार असल्याचं ते म्हणाले.

दैनंदिन व्यवहारातल्या गंभीर समस्यांचं निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मंच उपलब्ध करून देणं, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन आणि समस्या सोडवण्याची संस्कृती विकसित करणं, हा या उपक्रमाचा उद्देश्य आहे. सकाळी आठ ते रात्री आठ पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये सॉफ्टवेअर विकसित करणाऱ्या विद्यार्थ्यांचा संघ केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम मंत्रालयाच्या प्रॉब्लेम स्टेटमेंट वर सॉफ्टवेअर विकसित करणार आहेत.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेचे २६वे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांनी आज पदभार स्वीकारला. संजय मल्होत्रा हे भारतीय प्रशासकीय सेवेतले राजस्थान केडरचे १९९० सालचे अधिकारी असून, ते अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर कार्यरत होते.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४चं वितरण होणार आहे. यावर्षी विविध श्रेणींमध्ये एकूण ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये राज्यातल्या सहा पंचायतींचा समावेश आहे. ग्रामीण भागात प्रशासन आणि विकासासाठी काम करणार्या पंचायतींना हे पुरस्कार दिले जातात.

****

श्रीमद् भगवद् गीता जयंती आज साजरी होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय संस्कृती, अध्यात्म, आणि परंपरेचं मार्गदर्शन करणाऱ्या दैवी ग्रंथाचा स्थापना दिवस म्हणून साजरा होणारा हा पवित्र सण सर्वांना कर्मयोगाचा मार्ग दाखवू दे असं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

धुळ्यात आज सलग दुसऱ्या दिवशी निचांकी पाच पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. राज्यात इतर ठिकाणी देखील तापमानात लक्षणीय घट झाली आहे.

****